मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अग्निसुरक्षा शिबिरास व्यवसायधारकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपतत्र' आवश्यक कागदपत्रांची माहिती देण्यात आली : चिखली, सोनवणे वस्ती येथील 'टाऊन हॉल' येथे मार्गदर्शन शिबिर पार पडले



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत गुरुवार, दिनांक १२ सप्टेंबर रोजी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील चिखली, कुडळवाडी व तळवडे परिसरातील व्यावसायिक मालमत्ताधारकांना 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपतत्र' प्राप्त करून घेण्याची प्रक्रिया व आवश्यक कागदपत्रांची माहिती देण्यासाठी चिखली, सोनवणे वस्ती येथील 'टाऊन हॉल' येथे मार्गदर्शन शिबिर पार पडले. याप्रसंगी अग्निशमन विभागाचे उपायुक्त, मनोज लोणकर, उप अग्निशमन अधिकारी बाळासाहेब वैद्य यांनी व्यावसायिकांना मार्गदर्शन केले.

मार्गदर्शन शिबिरामध्ये व्यावसायिक मालमत्ताधारकांना 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' प्राप्त करून घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांबाबत माहिती देण्यात आली. त्याचबरोबर, शिबिरामध्ये व्यावसायिक मालमत्ताधारकांच्या अडचणींचा तत्काळ निरसन करण्यात आले. व्यावसायिक मालमत्ताधारकांना अग्निशमन उपकरणे हाताळण्याची पद्धती, व्यावसायिक मालमत्ता अग्निसुरक्षेच्या दृष्टीने पूर्ण सुरक्षित करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची व यंत्रणांची इत्थंभूत माहिती देण्यात आली. शहरातील व्यावसायिक मालमत्ताधारकांना आपली मालमत्ता अग्निसुरक्षित करण्यासाठी अटींची पूर्तता करणे गरजेचे आहे. ज्यांनी अद्यापि पूर्तता केली नाही, अशा ५,०९३ मालमत्ताधारकांना नोटिस बजाविण्यात आली आहे. यापैकी, ९७० मालमत्ताधारकांची प्रकरणे विभागामध्ये आली आहेत. यामधून ४२९ मालमत्तांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असून ३१३ मालमत्तांची प्रकरणे व्यावसायिक अग्निसुरक्षा प्रमाणपत्राकरिता प्रक्रियेत आहेत. याबरोबरच, आतापर्यंत ९२ व्यावसायिक मालमत्ताधारकांना 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' प्रदान करण्यात आले आहे.

> पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील व्यावसायिक मालमत्ता अग्निसुरक्षित होण्यासाठी अग्निशमन विभागाकडून ज्या व्यावसायिक मालमत्तांनी अग्निसुरक्षा उपाययोजनांची पूर्तता केली आहे, अशा मालमत्तांना 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' देण्यात येत आहे. शहरामध्ये आगीच्या घटना घडू नयेत यासाठी सर्व व्यावसायिक मालमत्तांनी अग्निसुरक्षा उपाययोजनांची पूर्तता करून 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' प्राप्त करणे आवश्यक आहे.
>
> \- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

> शहरातील व्यावसायिक मालमत्तांना 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' प्राप्त करून घेण्यासाठी नोटिस बजाविण्यात आल्या आहेत. शहरातील ज्या व्यावसायिक मालमत्ताधारकांनी अद्यापि आवश्यक अटींची पूर्तता केली नसेल, तर त्यांनी त्वरित पूर्तता करून घ्यावी. अग्निशमन विभागाने आयोजित केलेल्या शिबिरांच्या माध्यमातून इत्थंभूत माहिती देण्यात येत आहे. व्यावसायिक मालमत्ताधारकांनी आपली मालमत्ता अग्निसुरक्षित करून 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' प्राप्त करावे व मालमत्ता सिल होण्याची कटू कारवाई टाळावी.
>
> \- प्रदीप जाभंळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

# चिखलीतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी 'ॲक्शन प्लॅन' तयार करणार : अजित गव्हाणे

## चिखली परिसरातील उद्योजक, गणपती मंडळांच्या कार्यकर्त्यांशी चर्चा



**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली भागात मोठ्या प्रमाणात लघुउद्योग आहेत. हे उद्योजक, येथे येणारा नोकरदार वर्ग वाहतूक कोंडीमुळे त्रस्त आहे. या वाहतूक कोंडीमुळे येथील लघुउद्योग बाहेर पडण्याची भीती आहे. त्यामुळे चिखली भागातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी 'ॲक्शन प्लॅन' तयार करणार असल्याचे स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी सांगितले. वाहतूक कोंडीमुळे येथील बाजारपेठ, लगतचे रस्ते यांच्या दळणवळणावर परिणाम होत असल्यामुळे प्राधान्याने चिखलीतील वाहतूक कोंडी सोडविणे गरजेचे असल्याचेही गव्हाणे यावेळी म्हणाले.

चिखली गावठाण परिसरातील गणेश मंडळे, येथील उद्योजक, नागरिक यांच्याशी स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी गुरुवारी (दि १३) संवाद साधला. यावेळी नागरिकांनी वाहतूक कोंडीमुळे होत असलेल्या अडचणी मांडल्या. उद्योजकांनी वाहतूक कोंडीमुळे अनेकदा उत्पादित तसेच कच्च्या मालाची वाहतूक अडकून पडते. त्यामुळे अनेकदा 'प्रोडक्शन' थांबवावे लागतात अशाही समस्या मांडल्या. या वाहतूक कोंडीला सोडवण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील. महापालिका, पोलीस प्रशासनाची मदत घेऊन याबाबत 'ॲक्शन प्लॅन' तयार केला जाईल असेही अजित गव्हाणे म्हणाले.

यावेळी चिखलीतील सामाजिक कार्यकर्ते विकास साने, यश साने, अमृत सोनवणे, जेष्ठ मार्गदर्शक विष्णुपंत नेवाळे, सोमनाथ मोरे, संदीप नेवाळे तसेच गणेश मोरे, खंडू मोरे, प्रभाकर ताम्हाणे, ॲड.भुजबळ, हनुमंत म्हेत्रे, माणिक म्हेत्रे, विजय म्हेत्रे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते

अजित गव्हाणे म्हणाले, चिखली परिसरातील साने चौक, नेवाळे वस्ती, सोनवणे वस्ती, शिवाजी महाराज चौक, कुदळवाडी, डायमंड चौक परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. सततच्या या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक, नागरिक त्रस्त झाले आहेत. साने चौक परिसरातून येणारी वाहने तसेच देहू-आळंदी रस्त्याने जाणारी वाहने यामुळे चिखली गावठाणातील चौकातही वाहतूक कोंडी होते. अशा समस्या नागरिक, सोसायटी धारक यांनी मांडल्या. साने चौक परिसरात दुकाने आणि हॉटेल संख्या बरीच आहे. येथे अनेकदा मनमानी पद्धतीने आडव्या गाड्या लावतात. त्यामुळे नागरिकांना वापरासाठी रस्ता अपुरा पडतो अशीही अडचण येथील नागरिकांची आहे.

# समाजभान ठेवून उत्सव साजरे करा : पार्थ पवार

## पिंपरी मध्ये वैभवनगर येथे गणेश मूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम हौद



**पिंपरी | प्रतिनिधी**

सण, उत्सव हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. यातील गणेश उत्सव महाराष्ट्र बरोबरच जागतिक स्तरावर भक्ती भावाने साजरा केला जातो. असे उत्सव साजरे करीत असताना मांगल्य व पावित्र्य जपत पर्यावरणाचे रक्षण करीत समाजभान ठेवावे असे आवाहन युवा नेते पार्थ पवार यांनी केले.

पिंपरी गावातील वैभवनगर येथे विजय आसवानी यांच्या संकल्पनेतून आसवानी असोसिएटस् आणि ॲस्पीफ्लाय इनव्हायरमेंट या संस्थेच्या वतीने गतवर्षी प्रमाणे खासगी जागेत गणेश मूर्ती विसर्जनासाठी लहान, मोठ्या आकाराचे दोन हौद करण्यात आले आहेत. त्यांचे उद्घाटन पार्थ पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उद्योजक राजूशेठ आसवानी, माजी नगरसेवक हिरानंद उर्फ डब्बू आसवानी, उद्योजक राजू आसवानी, श्रीचंद आसवानी, सतीश आसवानी, अनिल आसवानी, विजय आसवानी, अमर कुकरेजा, हितेश बटवा, हिरो मदयानी, सुनील चूगवानी, हरेश सेवानी, अविनाश इसरानी, फजल शेख आदी उपस्थित होते.

सण, उत्सव साजरे करीत असताना पर्यावरणाचे रक्षण व्हावे व गणेशोत्सव काळात नदी नाल्यांचे प्रदूषण होऊ नये. यासाठी यावर्षी देखील पिंपरी, वैभव नगर येथे कृत्रिम हौद उभारण्यात आले आहेत. येथे गणेश मूर्ती विसर्जित कराव्यात. विसर्जनाच्या वेळी श्रींच्या आरतीसाठी स्वतंत्र व्यवस्था केली आहे. महापालिकेच्या वतीने पाणी व निर्माल्यकुंड दिले आहे. संयोजकांच्या वतीने विद्युत व्यवस्था व स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच खासगी अनुभवी जीवरक्षक नेमण्यात आले आहेत. जीवरक्षक विधीवत पध्दतीने या हौदांमध्ये मूर्ती विसर्जन करतात असे संयोजक विजय आसवानी यांनी सांगितले. स्वागत श्रीचंद आसवानी, तर आभार विजय आसवानी यांनी मानले.

# पुण्यात सहा रस्त्यांवर पे अ‍ॅण्ड पार्क

## पालिकेने पाठवला शासनाकडे प्रस्ताव, चार चाकीला तासाला 20 तर दुचाकीसाठी 4 रुपये शुल्क

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेने शहरातील सहा रस्त्यांवर सार्वजनिक वाहतळ धोरण अंमलबजावणीचा निर्णय घेतला आहे. यामध्ये जंगली महाराज, फर्ग्युसन महाविद्यालय, ढोलेपाटील , नॉर्थ मेन रोड, औंध डीपी, बालेवाडी हायस्ट्रीट, आणि विमाननगर रस्त्याचा समावेश आहे.

महापालिकेने शहरातील सहा रस्त्यांवर सार्वजनिक वाहतळ धोरण अंमलबजावणीचा निर्णय घेतला आहे. यामध्ये जंगली महाराज, फर्ग्युसन महाविद्यालय, ढोलेपाटील , नॉर्थ मेन रोड, औंध डीपी, बालेवाडी हायस्ट्रीट, आणि विमाननगर रस्त्याचा समावेश आहे. येथे चार चाकीला तासाला २० तर दुचाकीसाठी ४ रुपये मोजावे लागतील.

पार्किंगचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे. या प्रस्तावाला शासनाकडून याला मान्यता मिळाल्यानंतर प्रायोगिक तत्त्वावर पे अ‍ॅण्ड पार्क सुरू करण्यात येणार आहे.

महापालिकेने २०१८ मध्ये शहरासाठी पार्किंग पॉलिसी राबविण्याकरीता धोरणास मान्यता दिली होती. यानंतर शहरात पे अ‍ॅण्ड पार्क करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र निवडणुका आणि राजकीय भूमिकेमुळे शहरात या योजनेला मुहूर्त अद्याप मिळाला नाही.

शहरात गेल्या सहा वर्षांपासून पार्किंग धोरणाची अंमलबजावणी झाली नाही. त्याचबरोबर शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे एका सामाजिक संघटनेकडून नगरविकास विभागाकडे तक्रार करण्यात आली आहे. नगरविकास विभागाने याबाबत महापालिका प्रशासनाला खुलासा विचारला. महापालिकेने याबाबतची वस्तुस्थिती शासनाला कळवली आहे.

महापालिका प्रशासनाने रस्त्याची निवड करताना रहदारी आणि व्यापारी पेठांचा समावेश असलेले रस्ते निवडले आहेत. मोठ्या प्रमाणावर रहदारी असणारे हे रस्ते आहेत. त्यामुळे या रस्त्यांवर तासाला २० रुपये तासाला पार्किंग शुल्क चारचाकी वाहनांसाठी आकारण्यात येणार आहे, दुचाकीसाठी ४ रुपये तासाला नागरिकांना मोजावे लागतील.

शहरातील रस्त्यांवर पार्किंग पॉलिसीची अंमलबजावणी करण्यासाठी २०१८ मध्ये महापौरांच्या अध्यक्षतेखाली समिती करण्यात आली. या समितीने सहा महिन्यांमध्ये रस्त्यांचा अभ्यास करून सर्वसाधारण सभेसमोर अहवाल द्यावा. त्याचबरोबर पाच रस्ते निश्चित करून धोरणाची अंमलबजावणी करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला होता. मात्र या समितीकडून कोणतीच कार्यवाही झाली नाही. त्यामुळे शहरात पार्किंग पॉलिसीची अंमलबजावणी झाली नाही. वाहतूक कोंडीमधून सुटका होण्यासाठी संपूर्ण शहरात पार्किंग पॉलिसीची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. मात्र, आता राज्य शासनाची मान्यता मिळाल्यानंतर पार्किंग धोरणाचा लवकर निर्णय होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.




### या रस्त्यांची शिफारस

» महापालिका प्रशासनाने शहरातील ३२ रस्त्यांचा अभ्यास करून यापैकी सहा रस्त्यांवर पार्किंग पॉलिसीचे धोरण प्रायोगिक तत्त्वावर लागू करता येईल असे ठरवले . यामध्ये जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन महाविद्याल रस्ता, ढोलेपाटील रस्ता, नॉर्थ मेन रोड, औंध डीपी रस्ता, बालेवाडी हायस्ट्रीट रस्ता आणि विमाननगर रस्त्याचा समावेश आहे. सर्वसाधारण सभा सध्या अस्तित्वात नसल्यामुळे राज्य सरकारने याबाबत निर्णय घेऊन महापालिका प्रशासनाला कळवावे अशी विनंती करण्यात आली आहे.

### पार्किंग धोरण निर्णय लवकर

» शहरात पार्किंग धोरणाची अंमलबजावणी करण्यात यावी, यासाठी बैठका घेतल्या जात आहेत. या धोरणासाठी वाहतूक पोलिसांनासुध्दा विचारण्यात आले आहे. शहरात पार्किंग पॉलिसीची अंमलबजावणी करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी निर्णय न घेतलेल्या प्रस्ताव शासनाकडून मान्य करण्यात मिळणे आवश्यक आहे. शहराच्या वाहतुकीला शिस्त आणि वाहतूक कोंडीमधून सुटका होण्यासाठी संपूर्ण शहरात पार्किंग पॉलिसीची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. मात्र, आता राज्य शासनाची मान्यता मिळाल्यानंतर पार्किंग धोरणाचा लवकर निर्णय होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# पुण्यात तुतारीसाठी 43 जण इच्छूक

## सर्वाधिक अर्ज शिवाजीनगरमधून तर कसब्यातून एकच अर्ज

**पुणे | प्रतिनिधी**

अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून पुण्यातील आठही विधानसभा मतदारसंघासाठी इच्छुक उमेदवाराचे अर्ज मागविण्यात आले होते. त्यात ४३ जणांनी पुण्यातून लढण्याची तयारी दर्शविली आहे. दि.१० सप्टेंबरपर्यंत हे अर्ज आलेले असल्याची माहिती शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी दिली. लवकरच या सर्व इच्छुक उमेदवारांचा मुलाखत कार्यक्रम जाहीर करण्यात येईल, असेही प्रशांत जगताप यांनी सांगितले.

या अर्जांमध्ये सर्वाधिक ९ अर्ज खडकवासला विधानसभा मतदारसंघ, ८ अर्ज शिवाजीनगर तर ७ अर्ज वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातून आले असून सर्वात कमी अवघा एक अर्ज कसबा विधानसभा मतदारसंघातील आहे.

तर, राष्ट्रवादीकडून स्वत: जगताप यांच्यासह माजी नगरसेवक तसेच पक्षाच्या शहर पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार

### विधानसभेसाठी चार जागांची मागणी...

» राष्ट्रवादीकडून सर्वच मतदारसंघासाठी अर्ज मागविण्यात आले असले तरी महाविकास आघाडीच्या प्राथमिक चर्चेनुसार खडकवासला, हडपसर आणि वडगावशेरी विधानसभा मतदारसंघ पवार गटाला मिळणार आहे. तर, पवार गटाकडून पर्वती विधानसभा मतदारसंघाचीही पुण्यात मागणी करण्यात आली आहे. मात्र, शिवसेना उध्द्व ठाकरे गटालाही ही जागा हवी असून ही जागा राष्ट्रवादीला दिल्यास शिवसेनेला राज्यात मुंबईत अथवा इतरत्र एक जागा दिली जाऊ शकते, असे पक्षाकडून सांगण्यात येत आहे.

# दिघी बायपास रस्त्याच्या कामाला “गती”

## दिघीतील वाहतूक कोंडी कमी करण्यास होणार मदत ,आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

**पुणे | प्रतिनिधी**

दिघी- भोसरीला जोडणारा सीएमई (कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग) च्या भिंतीलगत असलेल्या दिघी बायपास रस्त्याचे काम मार्गी लागले आहे. या रस्त्याचे काम सुरू झाले असून, लवकरच रहदारीसाठी खुला करण्यात येणार आहे. भोसरी विधानसभा मतदार संघातील भाजपा आमदार महेश लांडगे यांनी समाविष्ट गावांची ‘कनेक्टिव्हीटी’ वाढवण्यासाठी सातत्यपूर्ण पुढाकार घेतला आहे. दिघी-भोसरी सीएमई सीमा भिंतीलगतच्या रस्त्याचे काम करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी मागणी केली होती. त्यानुसार कामाला सुरूवात करण्यात आली.

माजी नगरसेवक विकास डोळस म्हणाले की, दिघी-भोसरी सीएमई भिंतीलगतचा रस्त्यामुळे भोसरीला जाण्यासाठी पर्यायी रस्ता (बायपास) उपलब्ध होणार आहे. त्यामुळे वाहनचालक व नागरिकांचा वेळ व किमान १ किमीचे अंतर वाचणार आहे. धर्मवीर संभाजी महाराज चौकातील (ममता स्वीट जवळील) ट्रॅफिक कमी होण्यास मदत होणार आहे. दररोज संध्याकाळ च्या वेळेस धर्मवीर संभाजी महाराज चौकात ट्रॅफिक जाम होते. अनेक नागरिक त्या ट्रॅफिक जॅममध्ये अडकतात. आता रस्त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे.





“ समाविष्ट गावांतील महानगरपालिका मंजूर विकास आराखडाप्रमाणे (डीपी) रस्ते विकसित करण्यावर आम्ही प्राधान्याने भर दिला आहेत. रस्ते आणि पायाभूत सोयी-सुविधा विकसित केल्यामुळे “चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर’ विकसित झाला. दिघीची कनेक्टिव्हीटी वाढवणे आणि धर्मवीर संभाजी महाराज चौकातील वाहतूक कोंडीची समस्या सोडण्यासाठी सीएमई भिंतीलगतचा रस्ता मदतशील ठरेल. या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे आणि रस्ता नागरिकांसाठी खुला करावा, अशा सूचना प्रशासनाला केल्या आहेत.

- **महेश लांडगे**, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# शहरात वाहतूक कोंडीचे 26 हॉटस्पॉट

## पिंपळे सौदागरमध्ये उपाययोजना सुरू : वाहतूक पोलीस, महापालिका, एनएचएआयच्या सर्वेक्षणातील माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाहतूक कोंडीची ठिकाणे शोधण्यासाठी वाहतूक पोलीस, महापालिका प्रशासन आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) यांनी सर्वेक्षण केले आहे. सर्वेक्षणामध्ये शहरातील विविध २६ ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे आढळले. कोंडीला कारणीभूत ठरणारे पिंपळे सौदागरच्या शिवार चौकातील आयलँड पहिल्या टप्प्यात काढून टाकण्यात आले आहे.



शहरात विविध ठिकाणी वाहतूक कोंडी का होत आहे, याचा शोध सध्या घेतला जात आहे. तसेच वाहतूक पोलिसांची संख्या वाढविणे, रस्त्यावरील अतिक्रमण काढणे, रस्त्यांची दुरुस्ती करणे आणि रुंदीकरण करण्याचे काम हातात घेतले जाणार आहे.

रहाटणी-पिंपळे सौदागर येथील शिवार चौक हा नाशिक फाटा ते हिंजवडी बीआरटीएस रस्त्या वरील मुख्य चौक आहे. शहरातील व परिसरातील नागरिकांना येण्या-जाण्यास हा रस्ता सोयीस्कर असून, या रस्त्याचा वापर जास्त होतो. मात्र, त्यामुळे शिवार चौकात वाहतूक कोंडी नित्याची बाब बनली आहे.

वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी, नागरिकांची कोंडीतून सुटका करण्यासाठी शिवार चौकातील सर्कल काढण्याचा सूचना पोलिसांनी आणि स्थानिक नेत्यांनी महापालिकेला केल्या होत्या. त्यानंतर येथील सर्कल काढुन टाकण्यात आला आहे. यामुळे कोंडी सुटण्यास काही प्रमाणात मदत होणार आहे. परंतु, अर्बन स्ट्रीट डेव्हलपमेंट योजनेंतर्गत रस्ते लहान आणि फुटपाथ मोठे झाल्याने वाहतूक कोंडी नित्याची बाब बनली आहे.

गेल्या काही वर्षांत पिंपरी-चिंचवड शहराचा विकास मोठ्या वेगाने होत आहे. एमआयडीसी, आयटी कंपन्या, मोठा - मोठ्या शैक्षणिक संस्था, रुग्णालये, हॉटेल्स, मॉल अशा सर्व गोष्टी शहाराच्या प्रत्येक भागात विकसित झाल्या आहेत. त्यामुळे शहरात नोकरी, कामधंद्यासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. शहराचा विकास होत असल्याने शहरात घर घेऊन वास्तव्यास येणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे शहराची लोकसंख्या गेल्या काही वर्षांत ३० लाखांवर झाली आहे. लोकसंख्या वाढल्याने शहरातील वाहनांची संख्याही वाढली आहे. या सर्व कारणांमुळे शहरातील विविध भागांत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते.

वाकड, हिंजवडी, निगडी, रावेत, भोसरी, मोशी या सर्व भागांमध्ये वाहतूक कोंडीची समस्या जाणावते. शहरातील काही भांगांतील रस्त्यांवर सायंकाळच्या वेळेत दोन-दोन तास वाहतूक कोंडीत अडकून रहावे लागते. लहान रस्ते, रस्त्यांची सुरु असणारी कामे, मेट्रोचे काम यांमुळे ही वाहतूक कोंडी होते. शहरात वाहतूक कोंडी नित्याचीच झाल्यामुळे नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. या गोष्टीची दखल घेत नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी शहरात कोठे कोठे वाहतूक कोंडी होते, याचा सर्व्हे करण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार, वाहतूक पोलीस, महापालिका प्रशासन आणि एनएचएआयने शहरातील वाहतूक कोंडीचा सर्व्हे केला. या सर्व्हेमध्ये शहरातील २६ ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनात आले आहे.

कोणत्या परिसरातील कोणत्या रस्त्यावर, कोणत्या चौकात वाहतूक कोंडी होते, याचा सर्व्हे झाला आहे. तसेच या ठिकाणी का वाहतूक कोंडी होते, याच्या कारणांचाही शोध घेण्यात आला आहे. अनेक चौकांमध्ये अतिक्रमणे झाली आहेत, रस्त्यांवर खड्डे पडले आहेत, रस्ते अरुंद आहेत, अशी कारणे समोर आली आहेत. त्यानुसार, वाहतूक कोंडी होणाऱ्या प्रत्येक चौकात तसेच रस्त्यावर उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### वाहतूक कोंडीचे हॉट स्पॉट

**» मुकाई चौक, गोडाऊन चौक, फिनोलेक्स चौक, भारत माता चौक, खंडोबा माळ चौक, बोऱ्हाडे वस्ती चौक, त्रिवेणीनगर चौक, नाशिकफाटा, लक्ष्मी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी चौक, भुजबळ चौक, ताथवडे अंडरपास, काळा खडक रोड, तळवडे चौक, भुमकर चौक, फोनिक्स मॉल परिसर, काशिद पार्क, भोसरी बस स्टँड, पुनवळे ब्रिज अंडरपास, चिखली चौक, देहू फाटा, टिळक ब्रिज, दापोडी मेट्रो स्टेशन, गणेशनगर चौक, डांगे चौक.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये ऑलिंपिक दर्जाचे खेळाडू घडतील!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा विश्वास : 'स्पोर्ट्स सिटी'चा संकल्पातून क्रीडा क्षेत्राला चालना

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील स्थानिक खेळाडुंना कुस्ती, कबड्डी, धनुर्विद्या, नेमबाजी यासह रोविंग, स्केटिंग, बॉक्सिंग अशा नव्या युगातील खेळांमध्ये चमकदार कामगिरी करता येईल, अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे शहरात ऑलिंपिक दर्जाचे खेळाडू घडतील, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.

आमदार महेश लांडगे यांनी "स्पोर्ट्स सिटी पिंपरी-चिंचवड" या संकल्पनेसंदर्भात पिंपरी-चिंचवडकरांशी सोशल मीडियाच्या माध्यमातून संवाद साधला. यावेळी गेल्या १० वर्षांत त्यांनी उभारलेले महत्त्वाकांक्षी क्रीडा प्रकल्प आणि विकासकामांचा लेखाजोखा मांडला.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवडमधील स्थानिक खेळाडुंना हक्काचे व्यासपीठ निर्माण व्हावे. शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध व्हाव्यात. या करिता आम्ही "स्पोर्ट्स सिटी-पिंपरी-चिंचवड" असा संकल्प केला होता. २०१७ मध्ये सूज्ञ पिंपरी-चिंचवडकरांनी महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला बहुमताने काम करण्याची संधी दिली. त्यामुळे क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी आम्हाला खऱ्या अर्थाने वाव मिळाला. तत्पूर्वी, स्थायी समितीचा सभापती म्हणून काम करताना महानगरपालिका प्रशासनाचे राज्यातील पहिले स्वतंत्र क्रीडा धोरण तयार करुन आपण अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी आदर्श निर्माण केला होता, ही बाब मला अभिमानाने नमूद करावी, असे वाटते.



माझ्या राजकीय जीवनातील 'एक सोनेरी पान' म्हणावे, असे कार्य माझ्या हातून घडले. भारतीय संस्कृती आणि शेतकऱ्यांचा अभिमान असलेली "बैलगाडा शर्यती"वरील बंदी उठवण्यात आपण यशस्वी झालो. २०११ पासून यासाठी आपल्याला रस्त्यावरील आणि न्यायालयातील दोन्ही संघर्ष करावा लागला. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यामुळे तयार केलेला "रनिंग ऑबिलिटी ऑफ बुल्स" हा अहवाल निर्णायक ठरला. अखिल भारतीय बैलगाडा संघटना आणि शर्यतप्रेमींच्या सोबतीने हा लढा यशस्वी झाला. विशेष म्हणजे, शर्यतीवरील बंदी उठवल्यानंतर आपण देशातील सर्वांत मोठी बैलगाडा शर्यत आपल्या शहरात घेतली. त्याला शेतकरी, शर्यतप्रेमींनी विक्रमी प्रतिसाद दिला.

### देवेंद्र फडणवीस यांचे सहकार्य मिळाले..

**» आमदार लांडगे म्हणाले की, राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि महायुती सरकारच्या सहकार्याने व महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून आम्ही आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले. कै. पै. मारुतीराव रावजी लांडगे यांच्या नावाने सुरू केलेल्या या संकुलामध्ये नामवंत पैलवान नरसिंग यादव यांच्या मार्गदर्शनाने सध्या ७० कुस्तीपटू सराव करीत आहेत. तसेच, आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षण केंद्र, आंतरराष्ट्रीय स्केटिंग ग्राउंड, आंतरराष्ट्रीय रोविंग सेंटर, धनुर्विद्या (आर्चरी) प्रशिक्षण केंद्र, राष्ट्रीय रायफल व पिस्तुल नेमबाजी प्रशिक्षण केंद्र, लॉन टेनिस कोर्ट, विविध व्यायामशाळा, विविध जलतरण तलावांचे काम गेल्या १० वर्षांध्ये पूर्ण केले. आपल्या आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षण केंद्रामध्ये जगविख्यात "प्रो-कबड्डी" स्पर्धेतील खेळाडूंनी सराव केला.**

# अखेर महापालिकेने केले 30 टक्के सीसीटीव्ही दुरूस्त

## गणेशोत्सवात सुरक्षितेच्या दृष्टीने वेगाने उचलली पावले : उर्वरित कॅमेऱ्यांची दुरूस्ती पुढील दोन दिवसात करणार

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सवात नागरिकांची सुरक्षा लक्षात घेत पुणे महापालिकेने वेगाने पावले उचलत शहरातील बंद पडलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी ३० टक्के दुरूस्त केले आहेत.

पुणे महापालिकेने शहरातील मुख्य भागात लावलेल्या २ हजार ९०९ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी १ हजार ५४ कॅमरे बंद पडल्याची माहिती समोर आली होती. यामुळे शहरात खळबळ उडाली होती. ऐन गणेशोत्सवाच्या तोंडावर सीसीटीव्ही कॅमेरे बंद पडल्याने सुरक्षितता धोक्यात आल्याने काळजी व्यक्त करण्यात आली होती. मात्र, महापालिकेने वेगाने पावले उचलत शहरातील ३० टक्के सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची दुरूस्ती पूर्ण केली. उर्वरित कॅमेऱ्यांची दुरूस्ती पुढील दोन दिवसात होणार आहे, असे महापालिकेच्या विद्युत विभागाच्या प्रमुख मनीषा शेकटकर यांनी सांगितले.



शहरात होत असलेल्या मुसळधार पावसामुळे महापालिकेने बसवलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद पडल्याचे सांगण्यात आले होते. त्यानंतर बंद पडलेल्या कॅमेऱ्यांची दुरुस्ती महापालिकेने करावयाची की पोलिसांनी करावी, यावरुन शीतयुध्द सुरु झाले होते. यावर प्रसार माध्यमांतून यावर टीकेची झोड उटल्यानंतर महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी महापालिकाच कॅमरे दुरुस्त करणार असल्याचे जाहीर केले होते.

विद्युत विभागाच्या मागणीनुसार कॅमेऱ्यांच्या दुरूस्तीसाठी ५० लाख रूपये वर्गीकरणाने निधी उपलब्ध करून देण्यात आला. त्यानंतर तत्काळ शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या दुरूस्तीचे काम सुरू करण्यात आले. गणेशोत्सवाच्या काळात मोबाइल चोरी, साखळी ओढणे, आणि खिसेकापू यांसारखे गुन्हे वाढतात. अशा परिस्थितीत या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची दुरुस्ती आवश्यक होती.

### कॅमेऱ्यांच्या दुरूस्तीचे काम सुरू

» महापालिका प्रशासनाचा दावा होता की त्यांनी सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत आणि त्यांचे नियंत्रण पोलिसांकडे आहे. त्यामुळे पोलिसांनीच दुरुस्ती करायला हवी. मनपाच्या विद्युत विभागाने शहरात २ हजार ९०९ सीसीटीव्ही कॅमेरे लावले होते. त्यापैकी १ हजार ८५५ सीसीटीव्ही कॅमेरे सुरू होते, तर १ हजार ०५४ सीसीटीव्ही कॅमेरे बंद होते. शहरात गुन्हेगारीमध्ये मोठी वाढ झालेली आहे, अशा स्थितीत एक हजाराहून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्यामुळे शहराच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला होता. अखेर महापालिका आयुक्तांनी यामध्ये लक्ष घालून महापालिकेच्याच वतीने कॅमेऱ्यांच्या दुरूस्तीचे काम सुरू केले.

# उरूळी देवाची, फुरसुंगी गावांवर पुणेकरांचे 500 कोटी खर्च

## उरूळी देवाची आणि फुरसुंगी या गावात विविध विकासकामे करण्यासाठी महापालिकेने आतापर्यंत पाचशे कोटीं रुपयांचा खर्च केले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

उरूळी देवाची आणि फुरसुंगी या गावात विविध विकासकामे करण्यासाठी महापालिकेने आतापर्यंत पाचशे कोटीं रुपयांचा खर्च केले आहेत. आता या दोन्ही गावांची स्वतंत्र नगर परिषद स्थापन केल्याने पुणेकरांच्या कराच्या पैसा वाया गेला आहे.

या गावांवर गेल्या पाच वर्षात सुमारे २५० कोटी रुपये या गावांमध्ये खर्च झाले आहेत. कचरा भूमीमुळे निर्माण झालेल्या समस्येवर सन २००८ पासून २०० कोटींपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे. तसेच सांडपाणी व्यवस्थापनाअंतर्गत समाविष्ट ११ गावांच्या ३९२ कोटी रुपयांच्या आराखड्यापैकी या दोन्ही गावांत ४२ कोटी रुपयांची तरतूद आहे. या दोन्ही गावांत ३७१ हेक्टर क्षेत्रावर प्रादेशिक नगर नियोजन योजना (टीपी स्कीम) राबविण्याचेही नियोजित आहे. मात्र, या दोन्ही गावांची मिळून नगरपरिषद स्थापन करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्याने हा खर्च पाण्यात जाण्याची शक्यता आहे.

उरूळी देवाची आणि फुरसुंगी या दोन गावांची मिळून नगरपरिषद स्थापन करण्यात येणार आहे. त्याबाबतची अधिसूचना राज्याच्या नगरविकास विभागाने काढली आहे. राज्य शासनाच्या या निर्णयाचे पडसाद उमटण्यास सुरुवात झाली असून ग्रामस्थांना विचारात न घेता या निर्णयाविरोधात न्यायालयात दाद मागण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने या गावांमध्ये आतापर्यंत केलेल्या खर्चाची माहिती घेतली असता, महापालिकेने गेल्या काही वर्षात पाचशे कोटींहून अधिक खर्च या गावांमध्ये केल्याचे स्पष्ट झाले आहे. यातील काही कामे सुरू असून काही प्रस्तावित आहेत. त्यामुळे महापालिकेचा हा खर्च पाण्यात जाण्याची शक्यता आहे.



उरूळी देवाची आणि फुरसुंगी या गावांचा ऑक्टोबर २०१७ मध्ये महापालिका हद्दीत समावेश करण्यात आला होता. त्यानंतर महापालिका प्रशासनाकडून दोन्ही गावात विकासकामे सुरू करण्यात आली होती. गेल्या पाच वर्षात सुमारे २५० कोटी रुपये या गावांमध्ये खर्च झाले आहेत. तसेच ३९२ कोटी रुपयांच्या सांडपाणी वहन आराखड्यामध्ये या दोन्ही गावांमध्ये सुमारे ४२ कोटी रुपये खर्च करण्याचे प्रस्तावित असून त्यातील काही खर्चही करण्यात आला आहे.

उरूळी देवाची आणि फुरसुंगी येथील नागरिकांनी कचरा भूमीमुळे अनेक वर्षे समस्यांना तोंड दिले आहे. कचरा भूमीला विरोध करण्यासाठी नागरिकांनी आंदोलने करून कायदेशीर लढा दिल्याने या गावांमध्ये कचरा टाकणे बंद झाले. या ठिकाणच्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकेने दोनशे मेट्रिक टन क्षमतेचा कचरा प्रकल्पही सुरू केला. कचरा प्रक्रिया, वृक्ष लागवड अशा विविध कामांसाठी महापालिकेकडून २०० कोटींपेक्षा जास्त खर्च करण्यात आल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली. तसेच या गावांतील नागरिकांना २००८ पासून टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. रस्त्यांचीही कामे करण्यात आली. ही दोन्ही गावे महापालिकेत समाविष्ट करण्यात आल्यानंतर आतापर्यंत सुमारे २५० कोटी रुपयांची विकासकामे करण्यात आली आहेत. दोन्ही गावांमध्ये राबवल्या जाणाऱ्या प्रादेशिक नगरनियोजन (टीपी) योजनेच्या कामांसाठी महापालिकेने सातशे कोटींचा निधी उभारणीसाठीचे प्रयत्न सुरू केले होते. तसेच सांडपाणी व्यवस्था आणि पावसाळी गटारांच्या कामांचेही नियोजनही महापालिकेने केले होते.

### राज्य शासनाच्या निर्णयाला विरोध

» उरूळी देवाची आणि फुरसुंगी गावांची मिळून नगरपरिषद करण्याच्या निर्णयाला 'आपले पुणे' संस्थेचे उज्वल केसकर, माजी विरोधी पक्षनेते सुहास कुलकर्णी आणि माजी नगरसेवक प्रशांत बधे यांनी विरोध दर्शविला आहे. महापालिकेने या गावांसाठी नगर रचना योजना तयार केली असून जवळपास जमिन मालकांचे १००० कोटी रुपये बेटरमेंट चार्जेस माफ केले आहेत. या दोन गावांमध्ये मालमत्ता कराची थकबाकी २०० कोटी रुपयांची आहे.अकरा गावांच्या विकास आराखड्यातून ही दोन गावे वगळावी लागतील. ही गावे वगळल्या नंतर उर्वरित नऊ गावांचे नियोजन महापालिकेला करावे लागणार असल्याने या निर्णयाला विरोध असल्याचे केसकर यांनी स्पष्ट केले.